# असोशी

१८५६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १३७८५



राम शेवाळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम [illegible] .................... दि: ....................
क्रमांक .... [illegible] .... नोंद दि: [illegible]

# अ सो शी

[ निवडक कवितांचा संग्रह ]

स्थळप्रत.
अनुक्रम वि:
क्रमांक नों: दि:

राम शेवाळकर

ग्रंथ संग्रहालय
दा. क. 902

मूल्य दीड रुपया

प्रथमावृत्तीचे
सर्व हक्क कवीच्या आधीन

डिसेंबर ★ १९५६

मुद्रक : कुंडलराय मोहेकर
अशोक मुद्रणालय
धर्मपेठ, नागपूर

प्रकाशक : पराग प्रकाशन
पराग सदन, नागपूर

कै. बाअीच्या आठवणीप्रमाणेच
वि ष ण्ण र म्य अ स णा ऱ्या
सा यं का ली न अं त रा ळा स–

# अ सो शी

सुषमा, सत्यकथा, सह्याद्रि, नवभारत, म. सा. पत्रिका, साधना, युगवाणी इ. मासिकांमध्ये वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या निवडक कवितांचा हा संग्रह.

या संग्रहावरील मुखपृष्ठ माझे बालमित्र श्री शरच्चंद्र बोक्षे यांचें. अुदयोन्मुख चित्रकाराच्या अंगांतील आशास्पद कलागुणांबद्दल श्री. बोक्षे यांचें साभार अभिनंदन.

माझे स्नेही कवि मंगेश पाडगांवकर, सुषमा मासिकाचे संपादक कुंडलराय मोहेकर, प्राचार्य श्री. द. दाते व राम देशमुख यांचेंहि सहाय्य अमोल आहे. पण मला यांचे आभार मानता यायचे नाहीत. या मित्रांचें सौहार्द पाहिलें की माझी कृतज्ञता शब्दाभावीं मौन स्वीकारते अन् मूकपणें आपले पंखच ती मिटून घेते. माझा निरुपाय आहे.

गो पि का – धा म
अ च ल पू र श ह र

रा म शे वा ळ क र

... ग्रंथालय, ठाणे. स्थापित.
अनुक्रम २१९३८ वि: ३१०५
क्रमांक २३५०५ नों: दि: २८/५/५८
ग्रंथालय ठाणे
क्र. ९९०२
शाखा

# श्री. राम शेवाळकर यांची कविता

श्री. राम शेवाळकर यांचा हा पहिलाच काव्यसंग्रह आहे. गेल्या ५–६ वर्षांत लिहिलेल्या या कविता प्रमुख मासिकांतून प्रसिद्ध झाल्या होत्या; साक्षेपी रसिकांचें लक्ष त्यांनी निश्चितच वेधून घेतलें होतें. ठाकठीक, आकर्षक 'रचना' असलेल्या अनेक कविता आपण मासिकांतून वाचतों. रचनेच्या तथाकथित सफाअीमुळें त्या आपलें लक्ष क्षणभर वेधूनहि घेतात. परंतु अशा कवितांच्या पुनर्वाचनानंतर या कवितेला नव्या निर्मितीचा स्पर्शहि नाही; आहे ती नुसती सफाअीदार कारागिरी अशीच जाणीव पक्की होते. कुठल्याहि कालखंडांत जेव्हा काव्याला विशेष बहर येतो, तेव्हा अनेक रचनाकार प्रथित यशांच्या कांही बाह्य लकबी मोठ्या सफाअीने आत्मसात् करतात. अशा अनेक कविता काव्याची विलक्षण प्रगति होते आहे– असा कांही काळ आभासहि निर्माण करतात. परंतु कला आणि कारागिरी यांच्यांतला फरक अुघड होण्यास फारसा वेळ लागत नाही. गेल्या दहा वर्षांत मराठी कवितेला नवनवीन बहर येत आहे. तिच्यांतून व्यक्त होणाऱ्या अनुभवविश्वाच्या कक्षा सारख्या विस्तारत आहेत. नवनव्या आकृति–बंधनांतून ती साकारत आहे. हें जसें आहे तसेंच, नवतेची सोयी-

स्कर कोष्टकें मांडून होणाऱ्या कारागिरीचीहि पैदास वाढते आहे. 'निसर्ग प्रतिमांच्या माध्यमांतून व्यक्त होणारी तरल अनुभूति...' 'सेंद्रिय अनुभव'... 'तिरकस प्रतिमा'... अित्यादी कांही शब्द आणि लकबा परवलीच्या होऊन बसल्या आहेत. कुठलेहि नवे प्रयोग यशस्वी होऊं लागले आहेत, अशी जाणीव झाली की अशा तऱ्हेच्या कारागिरीला अूत येतो; कोष्टकें जमूं लागतात. युक्त्या सापडतात; आणि मग तंत्राच्या निरगांठी–सुरंगाठींत वाङ्‌मय बांधलें जाअूं लागतें.

मासिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या श्री. राम शेवाळकर यांच्या कवितेने लक्ष वेधून घेतलें याचें कारण त्यांची कविता ह्या तंत्राच्या साच्यांतून निघालेली नव्हती हेंच होतें. कांही प्रथितयश कवींच्या शैलीचा अनुभव घेण्याच्या विशिष्ट लकबीचे ठसे त्यांच्या काव्यावर अुमटलेले आहेत– हें खरें आहे. परंतु त्यांचें व्यक्तिमत्व झाकळलें जावें अितके हे ठसे गडद नाहीत. आणि म्हणूनच ह्या गोष्टीचा तपशीलवार अुल्लेख आवर्जून करावा असें मला वाटत नाही. आपल्याला आवडणाऱ्या कवींच्या कवितांच्या खुणा आपल्या प्रारंभीच्या काव्यनिर्मितींत रेंगाळत राहतात. परंतु कालंतराने कवीच्या अनुभवांना व्यक्तित्त्वाचा रंग चढूं लागतो. आवडणाऱ्या कवितेच्या मनांत रेंगाळणाऱ्या प्रतिध्वनींतून कविता निर्माण न होतां जिवंत अनुभूतींतून ती निर्माण होते. स्वाभाविकच अभिव्यक्तींतहि स्वतंत्रपणा येअूं लागतो. कुणाचाहि आदर्श पुढे ठेवून त्या साच्या बरहुकुम कुठलाहि नवा कवि कविता लिहायला बसत नाही. त्याची धडपड

असते आपले अनुभव साकार करण्याची ! आजच्या कांही प्रथित-यश कवींच्या अभिव्यक्तीच्या लकबा श्री. राम शेवाळकर यांच्या काव्यांत क्वचित् दिसतात. परंतु त्या अुपऱ्या, अंधानुकरणात्मक भासत नाहीत. त्यांच्या अनुभवसृष्टीशी त्या अेकात्म झालेल्या आहेत. ही जाणीव होते.

'प्रेम आणि निसर्ग' यांच्या अनुभूतीचे तरल क्षण श्री. शेवाळकर यांच्या बहुतेक कवितांतून व्यक्त झाले आहेत. या तरल क्षणांचें स्वरूप न्याहाळतांना, त्यांचे गहिरे रसगंध नाजूकपणें टिपून घेतांना त्यांची कविता निर्माण झाली आहे. तिला प्रयोजन असलेंच तर तें सौंदर्यनिर्मितीचें आहे ! कसल्याहि राजकीय वा सामाजिक तत्त्वज्ञानाचा प्रचारकी आक्रोश तिला अभिप्रेत नाही. आशावादी, मानवतावादी, निराशावादी अशा सोयीस्कर गुळगुळीत विशेषणांनी त्यांच्या कवितेचें वर्णन करतां येणार नाही; याचें कारणच हें की, कसल्याहि अभिनिवेशानें, आकसाने ते जीवनाकडे पहात नाहीत. आषाढ मेघांनी दाटलेल्या आकाशासारख्या काळ्या निराशेने त्यांचे शब्द कधी झाकळतात, तर कधी तेच शब्द शरद्‌ऋतूंतलें स्वच्छ समृद्ध अून अुधळतात. 'कसल्याहि वादाचें लेबल चिकटवून घेण्या-अितका जीवनाचा अनुभव अेकेरी नसतो' याची त्यांना जाणीव आहे. म्हणूनच अनुभवांतली गुंतागुंत, त्यांतल्या सुसंगत, विसंगत छटा न्याहाळण्यांत त्यांची प्रतिभा रंगून जाते. ह्यामुळेच कधी त्यांचें मन अेखाद्या लसलसत्या तृणपात्याशी एकरूप होअून 'सृजनांचें लुकलुकतें अंकुर' अनुभवतें.

तेव्हापासुन माझें नातें
लवलवणाऱ्या
गवताच्या पात्याशी जडलें
तेव्हापासुन अंतर अवघें
लसलसत्या
पोपटीपणानें डंवरून आलें...

–अशी त्यांची जाणीव पोपटीपणाने डवरून येते. या पोपटी–पणाचा स्पर्श हाच एक अत्यंत सखोल समृद्ध अनुभव आहे याची जणूं त्यांना अपरिहार्य जाणीव असते; आणि म्हणूनच ती रंग-संवेदना व्यक्त करण्यासाठी त्यांचे शब्द जणूं तृणपातें होण्याचीच धडपड करतात. त्या तृणपात्याची लवलव, त्याची मृदुता, त्याचा ओलसर पोपटी रंग हें सारें त्यांच्या शब्दकलेंतून व्यक्त होतें. कधी शेवाळकरांची प्रतिभा निसर्ग आणि मानवीमन यांच्या परस्पर संबधांच्या चिंतनांत रंगून जाते.

अिथे बसावें मीहि अुकलित
धूसरतेच्या विळख्यासोबत
सकाळचें अन् नीरवतेचे
शून्यमनाशी लागेबांधे !

–ही जाणीव व्यक्त करीत असतांना, हें लागेबांधे अुकलित असतांनाच त्यांची कविता जणूं न कळतच आकार धारण करूं लागते. त्यांच्या शब्दांचा ताल बदलतो, सूर बदलतो. अशावेळी तृणपात्याची पोपटी सळसळ व्यक्त करण्यासाठी धडपडणारे त्यांचे शब्द विलक्षण

गंभीर, आशयघन बनतात. कधी त्यांची अनुभूति एका निराळ्याच आत्मविश्वासानें तळपते. दहा दिशांच्या शलका सहज बोटावर खेळवीन असें तिला वाटूं लागतें. आणि–

कुबेर येअिल आता दारीं
हाती घेअून झोळी–काठी
परमात्मा होअील भुकेला
माझ्या आशीर्वादासाठी...

–अशा भव्य साक्षात्काराने त्यांचे शब्द भारले जातात, तर कधी जीवनांतल्या विफलतेच्या विस्कळीतपणाच्या जाणीवेने त्यांचें मन खिन्न, अुदास बनतें. हा एकाएकीपणा, हीं शून्यता, आजच्या बहुतेक संवदेनाशील मनांना विव्हल करून सोडते. जाणीव बधीर करणाऱ्या ह्या शुन्यतेचे पडसादहि श्री. शेवाळकर यांच्या कवितेंतून अुमटले आहेत.

अुरे फाटलेपणास
फक्त निष्फळाची भीति
कििति जोडलीं ठिगळें
जरी अुसन्या आशेचीं !
आता संबध आपुलें–
विरलेलें वस्त्र एक.
अिथे शिवतां तयास,
तिथे फाटे आणखीच !!

—ही जाणीव व्यक्त करीत असतांना त्यांच्या शब्दांतून विकलतेची वेदना साकार होते. त्यांच्या अशा कवितांना तथाकथित 'अर्थ' कधीच नसतो. कांही प्रतिमांतून ती वेदना हलकेच सूचित झालेली असते. या वेदनेचा स्पर्श होणें म्हणजे चत्या कवितेचा 'अर्थ' कळणें !

या सुखदु:खात्मक गुंतागुतीच्या जीवनाच्या विविध अनुभवच्छटा व्यक्त करण्यांत त्यांची कविता सध्या रंगून गेलेली आहे. एखाद्या धर्मोपदेशकाप्रमाणे उपदेशाचीं कोष्टकें घेऊन ती जीवन 'समजावून' सांगण्यासाठी उभी नाही. रूपकांचे अुंच डोलारे रचून जीवनावरचीं लांबलचक भाष्यें त्यांत कोंबतांना त्यांची प्रतिभा कधीहि आढळणार नाही. प्रचाराचे पायघोळ झगे घालूनहि ती मिरवतांना, आक्रोश करतांना (आणि एका डोळ्याने हळूच परिणाम कसा काय घडतो आहे हें सावधपणे न्याहाळतांना) कधी दिसणार नाही. त्यांची कविता म्हणजे एका संवेदनशील सौंदर्यासक्त मनाने उत्कटपणे अनुभवलेले कांही क्षण आहेत. त्यांच्याच शब्दांत सांगायचें म्हणजे—

हळुवार मोहरले
कंप कोवळे मनाचे !

असेंच तिचें आजचें स्वरूप आहे.

शेवाळकरांचीं बहुतेक प्रेमकविता यौवनांतल्या आर्त उत्सुक मनोवस्थेंतून स्फुरलेली आहे. ती अुत्कट आहे. पण बरीचशी एकसुरी आहे. जाणिवेच्या विविध पातळ्यावर येणाऱ्या प्रेमानुभवाचें

चित्रण तिला अजून करावयाचें आहे. कधीं स्वप्नांच्या धुंद झोपाळ्यावर बसवून उंचउंच नेणारे...नक्षत्रांना हळूच स्पर्श करून आणणारे, तर कधी वादळाची प्रमत्त धडक देऊन मुळासकट कोसळून टाकणारे, उध्वस्त करणारे, कधी पहिल्या पावसाने भिजलेल्या मातीसारख्या धुंद शारीर अभिलाषांचें, तर कधीं जाणिवेला ओझरता स्पर्श करून जाणाऱ्या पाऱ्याहूनहि तरल क्षणांचें... प्रेमानुभावांच्या या विविध छाटा शेवाळकरांच्या कवितेंत फारशा आढळत नाहीत. यौवनांतली व्याकुळ करणारी हुरहूर, कधीतरी हृदयाला स्पर्श केलेल्या स्मृतीने व्यथित होऊन झुरणारें मन, ज्यांतलें साफल्य आणि विफलतेची वेदना ह्या दोन्ही धुक्यासारख्या अंधुक असतात तें पहिलें वहिलें स्वप्नाळू प्रेम... याच क्षणांभोवती त्यांची सर्व प्रेमकविता गुफलेली आहे. 'शाप', 'तृप्त' 'बोगनवेल' ह्यासारख्याच कांही कविता याला अपवाद आहेत. या कवितांत कांही निराळ्या लकबीने अनुभव घेण्याचा, व्यक्त करण्याचा प्रयत्न आहे. यामुळे शेवाळकरांच्या प्रेमकवितेंतील भाववृत्तींचा एकसुरीपणा पांच सात कविता वाचल्यानंतर जाणविल्याशिवाय राहात नाही. कांही कवितांत तर 'मूड'च्या दृष्टीने अितका सारखेपणा आहे की, पहिल्या कवितेने अभिव्यक्तीचें पुरेसें समाधान लाभलें नाही म्हणून कवि पुन्हा त्याच भाववृत्तींतून नवी कविता निर्माण करीत आहे की काय असें वाटतें. 'दूर कुठे' आणि 'संध्यागीत' यासारख्या कांही कविता या दृष्टीने वाचून पाहण्यासारख्या आहेत.

शेवाळकरांच्या प्रेमकवितांतील ह्या भाववृत्ति निसर्ग

प्रतिमांतूनच सहसा व्यक्त होतात. या बहुतेक कवितांतून व्यक्त होणारी स्वप्नाळू हुरहूर निसर्गाच्या प्रतिमांत जणू काय पूर्णपणें भिनून गेली आहे असे वाटतें. ' वा सांजकाळची निष्कारण हुरहूर , असें ते म्हणतात, तेव्हा हीच हुरहूर जाणवते. 'दूर कुठे' ह्या भाबड्या भासणाऱ्या शब्दांतहि तीच हुरहूर थरारत असते. मेघाची सजल शीतल वासना...... सायंतन व्याकुळ करणारी तरल वीज...... प्राजक्ताने छेडलेला श्वासांचा सुरभित मालकंस....., बेदिल दर्गा भग्न दिवाणा...... कातर संध्यागीत...... आभाळ अेकले...... मानसीं फुलविले लाख मळें वाळ्याचे...... या सर्व प्रतिमा ह्याच भाववृत्तीने भारलेल्या आहेत. त्या प्रतिमा—

आसमन्त व्यापुन घुटमळलें क्षितिजांत
नि:शब्द तृणाचें कातर संध्यागीत
नि:श्वास वायूचे पुसती या वृक्षास
निष्पर्ण अुरीचे हारपलें हेत !
आभाळ अेकलें आळवितें केदार
अन् नीरवतेची बळीवली हुरहूर......

असें आर्त वातावरण त्यांच्या प्रेमकवितांतून निर्माण करतात. या कवितांतला अनुभव या वातावरणांहून निराळा करतां येणार नाही. प्रीतीची विफलता ज्या परिसरांत, वातावरणांत अनुभवली तो परिसर —त्याचा प्रत्येक कण, प्रत्येक क्षण त्याच वेदनेने ओथंबलेला आहे. या दृष्टीने त्यांची 'हळुहळु सांजवेळेंत, ही कविता वैशिष्टच पूर्ण वाटते. सांजवेळी रंग दिसतात —पण ते अपुऱ्या

स्वप्नाचे ! – क्षितिजाच्या मनांतलें सावळें चिंतन पहिल्या वहिल्या भेटीचें असतें. निळ्या शांततेंत हुरहूर कापत शिरते आणि तीहि कारणावाचून ! उजेडाचे डोळे पेंगुळतात, तेव्हा तम दाटून येतें तें मनांत ! या सर्व वातावरणाशी तो 'पहिला कोवळा भावनाभंग' तसेंच, 'कसा विश्वासलों कोवळेपणांत –घेउनिया तुझें भुकेलें वचन' यांतली व्यथा अेकरूप झालेली असते. निसर्गाच्या प्रतिमा सजावट म्हणून, अलंकरणासाठी म्हणून त्यांच्या कवितेंत सहसा येत नाहीत. त्या प्रतिमा भाववृत्तीने भारलेल्या ( charged ) असतात. त्या प्रतिमा जाणवणें म्हणजेच त्या अनुभवाचें स्पंदन जाणवणें !

'बोगनवेल, 'शाप', 'तृप्त' या कविता थोड्या निराळ्या आहेत. 'बोगनवेल' ह्या कवितेंत रसगंधाच्या संवेदनांतून अेक नाजुक भावना बोलकी झाली आहे. लाल अबोली फुलांनी लवलेली बोगनवेल 'त्याची' लाडकी आहे. ती बोगनवेल हातांनी कुरवाळीत असतांना त्या पर्णांचा मेळ तिच्या मनांतल्या स्मरणाशी जुळतो. हा नाजुक मेळ, पिंपळाच्या फांद्यावरचें पिवळें हास्य, स्वाशीण कर्दळीचा विलोल शृंगार लाल पळसाचें अबोल आव्हान जाअीच्या तळी टपटपलेलें स्मित, छायेच्या गालांत सूर्यकरांनी खुलवलेली कळी... ह्या सर्व प्रतिमांतून अुमलत जातो. ही रसगंधाच्या संवेदनेचीं वर्तुळें मनांत नकळत थरारतात. या वर्तुळांतूनच लाल अबोली फुलांनी लवलेल्या बोगनवेलीसारखीच नाजूक लवचिक भावना मनांत साकार होते. 'तृप्त' ह्या कवितेची मांडणीहि थेट अशीच आहे; पण ही कविता 'बोगनवेल' या कवितेहून अधिक सलग, अेकात्म वाटते.

आणि पिवळ्या खणाचे
गोड वेध शेवंतीस
कुणा कुळवंतासाठी
तिचें तिलाच माहित !

–या अनुत्तरित प्रश्नाचें अुत्तर 'गुलाबी होकारा' सारखें मनांत तरळूं लागतें.

'शाप' हीहि अशीच अेक वेगळ्या प्रकारची कविता आहे. अेकाच मनांत निर्माण होणाऱ्या परस्पर विरोधी भावनांचें चित्र ह्या कवितेंत रेखाटलेलें आहे. कधी कधी प्रेमावरचा विश्वास पार अुडून जातो. प्रेम म्हणजे स्वप्नाळू वयांतला कोवळा हळवेपणा असेंच वाटूं लागतें.

प्रेमबीम सब मुळांत झूटे
हळवेंपण... पागलपण दुसरें
रडणें हें भ्याडांचें...

माया म्हणजे फांस रेशमी
प्रिय, प्रेयसी, प्रेमिक, प्रियकर
हें सारें शब्दांपरि भंगुर !!

–आणि मग शब्द अग्निबाण होतात. प्रेम मनांतल्या अंध प्रक्षोभाचें भक्ष्य बनतें. अशावेळी निर्दयपणांतहि विलक्षण सुख वाटूं लागतें!

या वेळी गर्वानें म्हणतों,
खराखुरा मी असाच निर्दय !

—पण हें क्षणभरच ! मग आठवतात भिजलेले डोळे कुरवाळणारे ‘ते’ ओठ, ती घट्ट मिठी, ती हळव्या काळोखाची शप्पथ ! आणि मग मनाच्या कठीण दगडी पहाडांतहि अेक झुळझुळणारा ओहळ जाणवतोच ! ‘तो आणि हा’ यांतला ‘मी’ खरा कोण हें प्रश्नचिन्ह मन जाळीत सुटतें:

तो किंवा हा
या दोहोंतिल खरा कोण ?
हें प्रश्न चिन्हहि
प्रेमावरच्या शंकेसम मन सुटतें जाळत.
तुजवरचा वैतागहि तुझिया
स्मृतीपरि सखि व्हावा दाहक
हें माझें वरदान आणखी—
—हाच मला शापही विदारक...

—असे अेकांतच ‘शाप आणि वरदान’ दडलेलें जाणवतें. विसंगत वाटणाऱ्या वृत्तींत संगति शोधण्याचा हा प्रयत्न आहे. मनाच्या गुंतागुंतीच्या घडणीची यांत सूक्ष्म जाणीव आहे. अखेर प्रेमांतच साऱ्या विसंगति बुडतात ! या कवितेंत अुपमा—अुत्प्रेक्षांची खैरात नाही. सरळ, प्रांजल, अभिव्यक्ति आहे ! विक्षिप्त प्रतिमांच्या युक्त्या करून नाटकी सखोलता निर्माण करण्याचा यांत कुठेच प्रयत्न नाही. अशा सखोलतेचा आभास निर्माण करणें— ही चालू फॅशन असूनहि तसा या कवितेंत कुठेच प्रयत्न नाही; हें विशेष आहे ! शेवटल्या कडव्यांत कलाटणी आहे; परंतु ही कलाटणी

'तंत्र' म्हणून 'योजिलेली' नाही ! ती अनुभूतीचाच अपरिहार्य भाग म्हणून अवतरलेली आहे. शब्दांचे स्फोटक अग्निबाण आणि झुळझुळता ओहोळ या परस्परविरोधी भावनांतून ही कविता साकार होते, शेवटीं तें दाहक प्रश्नचिन्हहि विरतें. अुरतें फक्त हळव्या काळोखाची शपथ ! हीच सूचक प्रतिमा मनांत तरळत राहते !

शेवाळकरांची निसर्ग कविताहि अशीच वैशिष्ट्यपूर्ण आहे. निसर्गकविता, प्रेमकविता हे शब्द विषयांचे कप्पे पाडण्यासाठी येथे वापरलेले नाहीत. निसर्ग पंचेंद्रियाच्या संवेदना या जेव्हा भावविश्वांत पार मिळून जातात, तेव्हा कवितांना विषयाचीं लेबलें लावून त्यांची कृत्रिम विभागणी (water tight compartments) करणें शक्य नसतें. विवेचनाच्या सोयीसाठीच हे शब्द वापरावयाचे असतात हें येथें ध्यानांत ठेवलें पाहिजे !

निसर्गाचीं विविध रूपें न्याहाळण्यांत, निसर्गांत प्रतीत होणाऱ्या सृजनशक्तीचा वेध घेण्यांत शेवाळकरांची कविता रंगून गेलेली दिसते. निसर्गांत त्यांना चैतन्याचा साक्षात्कार होतो. रसगंधाची ही धुंद करणारी दुनिया आहे.

जुइवर लक्ष तुरे
गंधाचा नटवीत पिसारा वायुलहर विहरे......
नकळत शीळ फुले
शांत स्वरांच्या सुबक झालरी लेवुन गंध झुले.

—या कवितांत संवेदना अेकमेकांत गुंफल्या जातात. आणि

क्षणांत अनुभवाचें सातरंगी इंद्रधनुष्य मनांत झुलूं लागतें. चिंचेच्या झाडाभोवतीचे क्षण हिरवे बनतात. क्षणांना रंग येतो आणि रंगांना क्षणाचे तरल पंख फुटतात ! हा अनुभव घेतांना—

आज पावसाला माफी
आज माफी वादळाला
आज वेदनावरती
तृप्त मोद अंकुरला !

—अशी मनाची अवस्था होते मनांतला हा साक्षात्कार स्थिर-चरांतून अुमलतांना दिसतो

दगडांतहि शिरले
नवे कंप, नवे प्राण
डाहाळींतून स्फुरले
नवें स्वर, नवें गान !

निसर्ग आणि भावनानुभव यांत फारकत करणें येथे शक्य नाही. अशी फारकत होअूं शकत नाही. तेव्हाच खरीखुरी निसर्ग कविता निर्माण झाल्याचा प्रत्यय येतो. अशा निसर्गकवितेचें केवळ निर्जीव, यांत्रिक छायाचित्र असें स्वरूप अुरत नाही ! कलावन्ताच्या संवेदनशील मनाचें स्पंदन त्यांतून अुमटलेलें असतें !

शेवाळकरांच्या कवितांतील अनुभवांची आणि प्रतिमांची सृष्टि कांही कविता वाचल्यानंतर "परिचित" वाटूं लागतें. तिच्यांतलें

नाविन्य ओसरेल की काय अशी भीति वाटूं लागते. या संग्रहापुरती तरी ही भीति खरी नाही हें निश्चित ! परंतु आजची लकब (Manner) अुद्याची यांत्रिक संवय (Mannerism) होअूं नये यासाठीच ही सूचना केली. ही जाणीव राम शेवाळकरांनाहि सूक्ष्मपणें झाली असावी असें त्यांच्या "नको आता रेंगाळणें", या कवितेवरून वाटते.

फुलावेत मौनांतून नव्या गीतांचे ताटवे
माझ्या भावनांना आता रंग हवे नवेनवे

–अशी आकांक्षा ते व्यक्त करतात ! कालपर्यंतच्या अनुभूति सुंदर होत्या; त्यांतून अनेक धुंद गीतें स्फुरलीं– पण त्या अनुभूति नव्या अनुभूतींच्या मार्गांतील अंतराय बनूं नये असें त्यांना अुत्कटपणें वाटतें.

भल्या सकाळी पाहतों गर्द मखमली आकाश
निळ्या मनांत साजते लख्ख ताऱ्यांची आरास
हिर्वळीच्या नेत्रीं जुन्या ओथंबती आठवणी
शहारते अलगेच तृणफुलांत चिमणी–
आजवरी रेंगाळलों याच कौतुकाच्या सवे
माझ्या भावनांना आता रंग हवे नवेनवे !

–श्री. राम शेवाळकर यांच्या पुढच्या काव्यसंग्रहांत हे अनुभूतीचे नवनवे रंग पहावयास सापडतील अशी मला खात्री वाटते.

या नव्या विकासाचीं पदचिन्हें त्यांच्या कित्येक कवितांतून दिसत आहेत. या कविता अुद्याच्या नव्या, तेजस्वी विकासाची साक्ष देत आहेत.

१२५ । अ, साअीप्रसाद,
सायन : मुम्बअी २२. } **मंगेश पाडगांवकर**

# असोशी

क्रमांक ... नों: दि:

सांगायाचें आंतच विरतें
उरते ओठांवर लाचारी
डाव मनांतिल उधळुन पळतो
आगंतुक शब्दांच्या फेरी.

अतृप्तीच्या वा शापानं
कधी अटकतें वाक्य गळ्याशी
मलाच मी घाबरतो आणिक
मौनाची पाहून असोशी !

इथे बापुड्या संपातीच्या
पंखांना जळण्याची घाई...
तोंडांतुन ये लुळीपांगळी
तव प्रश्नांची थिटी कमाई !

## मज नको

मज नको धरित्री रविकरणीं नटलेली
वा स्वर्णसुमांची क्षितिजांतील झळाळी
पण स्वप्नभूमीच्या उद्यानीं जी वेल
मी फूल तियेचें होइन एक मलूल.

नक्षत्रफुलांची शेज नको मखमाली
वा वीचि मुलायम दूधसागरावरली
मज रुचे निळाई स्मितप्रभेची भाळीं
अन् व्योमकपोलीं चंद्रखळी खुललेली

छे, नको नीलिमा शिशिरांतील नभांचा
वा आर्द्र गारवा मार्गेसर-धरतीचा
मज हवी लाजरी पौषांतील पहांट
मी आलिंगिन तिज मृत्कण होउन तींत

मी नको व्हायला मेघपुंज आर्द्रांचा
पर्जन्य नको वा उतावीळ धारांचा

मी शिंप होउनी क्षुद्र गणावा सिंधू
सन्मुखीं पडावा स्वातीचा जलबिंदु !

मी यौवनहृदयीं प्रणयाचा उन्मेष
मी सुगंध होउन चुंबिन रमणीकेश
अन् आर्त आठवीं होइन नयनीं नीर
वा सांजकाळची निष्कारण हुरहूर !!

## आज जाहलों

आज जाहलों पुन्हा व्यथित मी
कठोरतेचें कवच फोडुनी
नि:संज्ञेचे, अशाश्वताचे
बाजु-बंद तट्तटां तोडुनी

हृदय–पाखरूं विपक्ष विव्हल
जुन्या व्रणांना चाटत सुटतें;
प्रतिक्रियेच्या सिकतेमाजी
शहामृगाची मान खुपसते !

निष्प्रेमाची उदास शय्या
नि:संगाची भयाण संगत
उग्र तमिस्त्रा अंवसेची ये
वेताळाचें ऊर दुभंगत !

वैफल्याचीं, वैक्लव्याचीं
आज श्रवाया हवींत गाणीं
तरीच आसुसतें हें अंतर :
'असा रहावा सदा व्यथित मी!'

## माझी संवेदना व्याली

माझी संवेदना व्याली
तिचीं असंख्यात बाळें
अहो आश्चर्य ! क्षणांत–
सुरू झाले खुळे चाळे

कुणी टोंचती मनास
कुणी सोसती हेळणा,
कुणा ऐकवेना परी
माझ्या व्यथांचा तराणा

कुणी होऊन लोपलें
हास्य क्षणैक ओठांत
कुणी मंजुळवी शीळ
स्वयं होत सुरावट

कुणी शाश्वत विराजे
जळ धूसर लोचनीं

श्रमदेवा आळवाया
स्वेदबिंदु व्हावे कुणीं.

कुणी रुधिर होऊन
आल्या ठायींच गोठलें
अपूर्तिच्या पाळण्यांत
प्रेम भुकेलें तान्हेलें !

कुणी लज्जा, कुणी माया
कुणी आसक्तीचें श्वान,
भविष्याचे शिल्पकार
ब्राम्हमुहूर्तिचें स्वप्न.

माझी संवेदना व्याली
तिचीं असंख्यात बाळें
चाळे त्यांचे पाहून ती
अंतरांत जळे पोळे !

## दूर कुठें

दूर  कुठें पर्जन्य लोभला
सजल वासना त्याची शीतळ
मेघांमधल्या तरल विजेपरि
कंपवीत  सायंतन  व्याकुळ

दूर  कुठें प्राजक्त  छेडतो
मालकंस श्वासांचा सुरभित,
अवचित शामल हसे  शर्वरी
प्रमदेच्या  मदमत्त  मनागत.

दूर  कुठें  मृतप्रेम  आठवी
बेदिल दर्गा  भग्न  दिवाणा
'पूर्वदिव्य'– जपमाळ घोकतो
राजमहल उध्वस्त पुराणा !

दूर  कुठें  पण  गाय  हंबरे
रित्या स्तनांशी वत्स  भुकेलें
माझ्या  यौवनमधुशालेंतहि
कुणा दिसावे लोचन  ओलें !

## संध्यागीत

आसमन्त व्यापुन घुटमळलें क्षितिजांत
नि:शब्द तृणांचें कातर संध्यागीत
नि:श्वास वायुचे पुसती या वृक्षास
निष्पर्ण उरींचे हारपलेले हेत.

आभाळ एकलें आळवितें केदार
नी नीरवतेची बळावली हुरहूर,
हा खुजा चंद्रमा रेखित स्वप्निल गूज
( भग्नाश मनाची उदासता निस्तेज ! )

त्या तिथे दूरच्या शुष्क टेकडीवरुन
अज्ञात कुणाची मशीद बघते खिन्न
हत मनोरथांचा पाहुन भीषण होम
गुदमरे अनावर निर्जल अन्तर्याम !

## जागृति–

जागृति, निःश्वास स्वप्नांचे फुलव तूं !

कोण जाणे गे किती आराधनेने
मानवाला यामिनीचा प्रेमलाभ,
विग्रहाच्या तीक्ष्ण घावांनो क्षणिक
चांदण्याचा उमललेला स्वप्नताज,
काल कां रुसलीस तूं संध्येपरो ?
चुंबनें नाजुक उषेचीं ये खुलव तूं
जागृति, निःश्वास स्वप्नांचे फुलव तूं !

गे तुझ्या बाहूंत ईर्षा हांसते
जिंदगी हिंदोल छायांचे पहाते
हिमकणाजैसी फलाशा लोपते
मानवाला दानवी दावीत नृत्यें
हास्य ओठीं क्रूर ये घेऊन, भोळे
कोड विश्वाचे नको पुरवू परंतु
जागृति, विश्वास स्वप्नांचे फुलव तूं !

वाटले होते कितीदा : तूं गडे
मजला नवें संगीत द्यावें, प्राण द्यावे
हासणाऱ्या पापण्यांच्या पाकळ्यांनी
गे स्मृतींचें तें सुगंधी गान गावें.
कोष तेजाचे रिकामे हे अता
तेच सोनेरी क्षणांचे स्वर झुलव तूं
जागृति, निःश्वास स्वप्नांचे फुलव तूं !

# तों कुणी कोकिळा...

हा वृक्ष येथला चिंचेचा ध्यानस्थ
ढाळीत उसासे अशुभाचे. करुणार्त
ये अवचित कुठुनी कसलें गंधित गीत
नी पर्णोपर्णी घुमते सायंसूक्त !

या संध्या-छाया घोषति गरुड पुराण
अन् आभाळाचा कळंकला अभिमान.
हेमन्त गोंवितो निजअश्रूंची वीण
क्षाळण्या मनीचें कोळपलेलें स्वप्न.

हें अशा अवेळी असेंकसें शुष्कलें
दिनरात मनासीं व्यथापुष्प जें जपलें?
जीवनीं उमळला ग्रीष्मताप आसुरी
तों कुणी कोकिळा कुहुकुहुली अंतरीं!



मराठी ... ग्रं. ठा. स्थलप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: वि: ........

## तुझ्या लोचनीं श्रावण

दावी क्षितीज संन्यस्त
ओठीं भगवें अमृत
संथ जळ अंतरीची
प्रीत निळो जोजवीत

कुशींतून टेकडीच्या
बघे आम्र हा लाजत
कुरवाळी अपुलेंच
मोहरलें मनोगत.

कुठें अवचित भंगलें
तप गूढ अेकांताचें
कशानेसें काजळलें
मन लाजाळू प्राचीचें

हळुहळूं प्रकाशाची
मृदु पापणी पालवे
दिसे अद्‌भुत आतलें
निळेंकाळें विश्व नवें.

होतों निःशब्द आपण
स्वप्नें न्यहाळत हींच
वर वत्सल नभाच्या
उरीं फुललें रोमांच

क्षणापूर्वीचा रुसवा
क्षणांतच विसरली
नेत्रांतील अग्निफुलें
कां ग अशीं कोमेजलीं ?

अशींकशीं हृदयांत
उमललीं पुष्पदळें
तारकांचे शुभ्र हास्य
अश्रूंतून निथळलें ?

वाटे – असेच सावें
तुझें ओघळतें स्वप्न
स्वस्थ मींहि पहुडावें
तव अंकीं विवशून.

–स्वस्थ मींहि पहुडावें
तव अंकीं विवशून
आणि असाच पहावा
तुझ्या लोचनीं श्रावण !

# येथे

अडखळेल येथे पाउल जातायेतां
उमलेल अंतरीं सुगंध आठवणींचा...

हंसविली कितिकदा मनीं जुओची कळी
कितिकदा दवाने भिजवियली पाकळी
उरिं गोड शहारे उडता प्रेमतुषार
अन् मूकपणातहि कंपित व्हावी तार !
ते क्षणैक रुसवे (आता हासविणारे)
ते रागलोभ दो ओठीं थरथरणारे
कोरडे हुंदके – तेंहि आठवते ना
अजुनही मधूनच ये दाटुन वेदना !
या स्थळीं शिंपिले सडे कुणीं मायेचे
मानसीं फुलविले लाख मळे वाळ्याचे
पण शुष्क जलाशयिं कमल शोधणें व्यर्थ
हें उरेल केवळ स्मृतिचें पावनतीर्थ !

...अडखळेल येथें पाउल जातायेतां
अन् खोल यातना करतिल व्याकुळ चित्तां !

## लपव

लेअी पुनव माघाची
अंगीं सुगंधाची उटी
कांति नितळ सतेज
गर्भ वसंताचा पोटीं.

ओघळलें वृक्षांतून
हास्य दुधाळ तृप्तीचें
हळुवार मोहरले
कंप कोंवळे मनाचे

मुखीं वायुच्या मंथर
नोल स्वरांचे फवारे
पुष्पकोषांत नाजुक
स्वप्नपराग हांसरे.

कुठूनसें . श्वानयुग्म
मोडी नीरवाची झोप
आणि स्वप्नांत शहारे
वत्स शान्तीचें अश्राप.

विश्व निद्रिस्त असून
उभी केव्हाची दारांत
–सखी, लपव लेकरूं
आज ग्रहणाची रात !

## जाणीव

तुझ्या डोळ्यांतले भाव
होते कधीकाळीं खरे
शहानिशेंत त्यांचिया
आज श्वासावेत वारे !

उरे फाटलेपणास
फक्त निष्फळाची भीति
किती जोडलीं ठिगळें
जरी उसन्या आशेचीं !

आता संबंध आपुले :
विरलेलें वस्त्र एक
इथें शिवतां तयास
तिथे फाटे आणखीच !

## शाप

कधि मी म्हणतों :
'प्रेमबीम सब मुळांत झूठें
हळवेंपण पागलपण दुसरें
रडणें हें भ्याडांचें किंवा
दंभखोर पोरींचें लेणें
माया म्हणजे फांस रेशमी
प्रिय, प्रेयसी, प्रेमिक, प्रियकर
हे सारे शब्दांपरि भंगुर ! '

कधीकधीतर
दारुण द्वेषाने मी जळतों
तप्त त्वेषाच्या परशूची
सहाण बनतों
मुखांत माझ्या येउन बसतीं
सहस्त्र धारांचीं हत्यारें
ओष्ठधनूंतुन असंख्य सुटती
अग्निबाण शब्दांचे स्फोटक
प्रक्षोभाचे भक्ष्य बनवितों
प्रेमाला, भावनेस आणिक

अवघ्या स्त्रीजातीला. . .तुजला !
सरल्यावर जहराचा अंमल
हळूंच मी डोकावुन बघतों
मनांत माझ्या
दिसतें मजला : दीन उभी तूं
पुशीत जखमा लाल वाहत्या
सांभाळुन वक्षाशीं सारीं
रक्ताळुन आलेलीं अपुल्या
नात्याचीं लक्तरें पुराणीं !
यावेळीं गर्वानें म्हणतो :
खराखुरा मी असाच निर्दय.

आणि कधीं. . .पण तेंहि सांगुं का ?
आणि कधी मज आठवतें तें :
भिजलेले मम डोळे अपुल्या
कुरवाळत ओठांनी ओल्या
घातलीस मज घट्ट मिठीसम
शप्पत हळव्या काळोखाची
विश्वासाची, न मोडण्याची.
...आठवतें हें अन् मी बनतो
पान गळालें शेंड्यावरचें

अगतिक होवुन अखेरीस जें
शरण त्याच धरणीला येतें !
अशाहि वेळीं (मनांत) म्हणतोः
खराखुरा हा असा असे मी
कठीण दगडी पहाडांतही
स्त्रावणारा झुळझुळता ओहळ.

. . .

तो किंवा हा
या दोहोंतिल खरा कोण ?
हें प्रश्नचिन्हही
प्रेमावरच्या शंकेसम मन सुद्दलें जाळत !
तुजवरचा वैतागहि तुझिया
स्मृतीपरी सखि व्हावा दाहक
हें माझें वरदान. आणखी
हाच मला शापही विदारक !!

## खूण

सारीं कापून काढावीं
नातीं ऋणानुबंधाचीं
मनीं खोचून ठेवावी
खूण मेलेल्या मायेची !

ओरबाडून फाडावें
खोटचा भावनेचें दुःख
पुढे उरावें केवळ
माझें माझ्याशींच सख्य.

विश्वासांत आजवर
मनें किती कालवलीं...
उन्हें सरल्यावरही
चाचपडली सावली !

खोल ओसाड डोळ्यांत
व्यर्थ क्षणांची दखल
झुकलेल्या पाठीवर
पराभवाची पखाल !

मान मुरडून फिरे
तान कुरळी घशांत
झालें आयुष्य उरलें
आता एक अधू गीत !

## अविचाराला–

क्षताळलेल्या जीर्ण अुरावर
गतकालाचें कराल तांडव,
वर्तमान हो रुग्ण क्षयाने
भाविकाल – सटवीचें शैशव !

क्रूर अधाशी नियती करिते
स्वेदाश्रूंचें अविरत प्राशन
अंतरांतली ग्रीष्मयामिनी
तगमगते निर्वायु होअुन.

हळूंच ये निःसंज्ञ मनावर
विरक्ततेची शीतल फुंकर,
युगान्त निद्रा मुचकुंदाची
कालयवन तद्पर्यंकावर.

कधीं मनोराउळीं थरारे
कृष्ण कल्पना निर्वाणाची;
आसक्तीचा सावध निग्रह:
अविचाराला 'नो व्हेकन्सी!'

## करुणा

जेव्हांपासुन माझें नातें
लवलवणाऱ्या
गवताच्या पात्याशी जडलें
तेंव्हांपासुन अवघें अंतर
लसलसत्या
पोपटीपणाने डंवरुन आलें !

किती साहिली मूकपणाने
तडतडणारी
धरतीने पहिलीच वेदना,
खोल देत निःशब्द हुंदके
किती भाकली
आकाशाची हताश करुणा !
स्तंभित झाले पाहून वारे
उलणारें हें
उग्र मौन, कवंती यातना,

पानांचीहि नुरली कुजबुज
आणि भयाने
डहाळींतली थिजे चेतना !
—अखेर सरलें हें दारुण तप
निश्चलतेंतुन
देत पिळोखे, उचलून माना
लुकलुकलें सृजनाचे अंकुर
धन्य वाटलें
धरणीच्या नवलाख कळांना!

तेव्हांपासुन माझें नातें
लवलवणाऱ्या
गवताच्या पात्याशीं जडलें
तेव्हांपासुन अंतर अवघें
लसलसत्या
पोपटीपणानें डंवरुन आलें !

# बोगनवेल

इथेंच मी कुरवाळित बसतें तुझी लाडकी बोगनवेल
आणि मनाशीं जुळतो नकळत पर्णांचा स्मरणाशीं मेळ.
पिवळें कवळें हास्य फुलवितो शाखांवर अश्वत्थकुमार
सलज्ज त्याची प्रेमगीतिका ऐकुनही निःस्तब्धच पार !
आळ्यांतिल स्वाशीण कर्दळी जपते निज शृंगार विलोल
समोर भगव्या फुलवंतींतुन पळसाचें आव्हान अबोल.
लेकुरवाळी अंग चोरुनी दूर उभी नारळी भिउन
बिसतंतूंच्या स्वरलहरी दर्वळती पुष्पदळांत अजून.
टपटपलें स्मित तळीं जाइचें; रसाळली मधुगंधकळी
सूर्यकरांनीं कुठें खुलविली छायेच्या गालांत खळी.
नकळत मन विव्हळे कुणास्तव झुरत एकली पाहुन केळ
हळूंच मज कुरवाळित हसते तुझी लाडकी बोगनवेल !

# पहांट-नाट्य

अंबर मूक अुभा
शून्यपणाने पाहत सारी झडली पर्णसभा
खंडित चिंच तिथे
अपमानित प्रीतीसम अपुले हिरवे क्षण जपते.
जुइवर लक्ष तुरे
गंधाचा नटवीत पिसारा वायुलहर विहरे
पहांट-नाटच खुले
सहज तमाचे भेदित काळिज तेजकमल उमले.
उडली त्यासरशी–
रमणीच्या हृदयाहुन नाजुक चिमणी भुर्रदिशी !
नकळत शीळ फुले
शांत स्वरांच्या सुबक झालरी लेवुन गंध झुले !

# चाहूल

किती वैतागाने तुवां
होता झाडिला शिणगार
निरुपायाने गळालें
पानपान भुईवर.

किती दिवस पाहिली
तुला तशीच विरक्त
मन राहिलें खिळून
वाळलेल्या पाचोळ्यांत

कुणासाठी एवढ्यांत
झाली होतीस अपर्णा
कशासाठी सारें व्रत
आणि निष्ठूर साधना ?

आत्ता कुठे पळसाने
तुझें फोडलें गुपित
आजवर लपवलेलें
हसूं फुटे डहाळींत.

तेव्हा विरक्तीची ओढ
आता नटायाची घाई
आंब्यावर उमटली
तुझी न्यारी नवलाई

आता बाकी ओळखलें
कशापाईं ही धांदल:
तुला आहे ना लागली
ऋतुराजाची चाहुल ?

## इथे बसावें...

दूर टेकडी
तलम धुक्याच्या दुलईखाली
अजुन झोपली,
लगतच झाडी
मुग्ध मनाच्या निश्चलतेपरि
स्वस्थ जराशी
आकाशाच्या आकांक्षेतुन घेत दिलासा
चिंब सावळा
गंधित रसमय हंसऱ्या पुष्पित
भवितव्याचा – सफळ उद्याचा,
अजुन यावी गार वायुची
अशीच नाजुक लाट लाघवी
माखुन तेथिल रंग धुक्याचे
शून्यतेस चुंबून स्वप्नमय

चाळवित:

मृदु डौल तृणांचा  
झाडांचें सळसळतें वैभव.  
अिथे बसावें मीहि उकलित  
(घुसरतेच्या विळख्यासोबत-)  
सकाळाचे अन् नीरवतेचे  
शून्य मनाशीं लागेबान्धे !

ग. ठा. स्वक्षत.
अनुक्रम २१८३८ दि: ३१०५
क्रमांक ९३५०५ नों: दि:

# तृप्त

हौद बदामी हुंगतो
शिर झेंडूचें लोभस
परकऱ्या कर्दळींचा
जरी विळखा गळ्यास.

उभी कमान कुलीन
जरा राखून अंतर
लाल बोगनवेलीचा
डोक्यावरून पदर !

हंसे कण्हेर शेजारी
तृप्त खोवून नजर
एवढ्यांत मिळवला
तिनें गुलाबी होकार

आणि पिवळ्या खणाचे
गोड वेध शेंवतीस
कुणा कुळवंतासाठी. . .
तिचें तिलाच माहित !

बुध्दास–

स्वीकार बिचाऱ्या शस्त्रांचे प्राणिपात
भिजलेलीं ज्यांचीं पातीं कारुण्यांत
रे तुझ्यामुळे विस्मरून भान युगांचें
अंधारहि जगला दिव्य क्षण तेजाचे !

पाहून मनाच्या देव्हाऱ्यांत निवांत
शिंपीत चांदणें हास्यांतून प्रशांत
वाटतें : जगाला कुरवाळाया आली
वैशाख पौर्णिमा तुझ्या रुपाने खाली !

आसक्ति झोपुं दे विषण्ण होवुन चित्त
जणुं प्रासादांतील यशोधराच वियुक्त
मग अंतरातला बोधिवृक्ष गंवसावा
सळसळून त्याने शाश्वत मार्ग कथावा:

'अत्ताहि अत्तनो नाथो
अत्ताहि अत्तनो गति।'

अज्ञानाने बुद्धं सरणं जावें
क्रौर्यानेहि धम्मं सरणं जावें
आणि कळीने अपुल्या सहवासाने
द्वैतालाहि संघं सरणं न्यावें !

अग्नीच्याहि नयनीं तरळें पाणी
विकल होउनी परतें वैर उपाशी
उद्धार व्हावया अपुला हिंसेसंगे
पातकें पातलीं पुण्याच्या दाराशीं !

स्वीकार बिचाऱ्या पापांचे प्रणिपात
पोळून निघाले ज्यांचे कोटि हात
अन् पुन्हां एकदा विसरुन भान युगांचे
रे जगता यावे तमास क्षण तेजाचे !

## उल्हास

आज पहिला अुल्हास
पाना पानांच्या रोमांत
कणाकणांत हवेच्या
ओल्या मातीच्या मनांत

आज हासले अवघे
तृण, पाणी, रोपें, वारें
धुंद नाचले ओहळ
दूर सरले किनारे

आज आनंदी आनंद
उरे व्यापुन आकाश
आले भरून भूमीचे
खोल तडे सावकाश.

आज पावसाला माफी
आज माफी वादळाला
आज वे द नां व र ती
तृप्त मोद अंकुरला !

आला भादवा भेदून
आर्द्र श्रावणाची कूस
उंच वृक्षांच्या वक्षांत
कोंब पावले विकास

आज सर्वत्र उल्हास !

★

ल स ल स ली पालवी
रम्य पोपटी ऐटींत
फांदीफांदीशीं जाहले
फुलाफळांचे केत.

दगडांतहि शिरले
नवे कंप, नवें प्राण,
डहाळींतून स्फुरले
नवे स्वर, नवें गान.

आज आल्हाद मावेना
स्वैर वाऱ्याच्या मनांत
त्याला सांगायाची घाओ
सारे तृणाच्या कानांत.

हळूं मोहरून आला
गोड शांततेचा कोष
एकांताच्या गालांवर
फिरे संतोषाचें पीस.

किती राहील लपून
रानफुलांचे मानस ?
मिटलेल्या पाकळ्यांत
उचंबळला सुवास.

आता फुलले उल्हास !

☆

दिशादिशांत हासऱ्या
दुमदुमला अुल्हास
कळचा कळचांत लाजऱ्या
घमघमला अुल्हास

भव्य फेंसाळ ढगही
शुभ्र पांढऱ्या गुंगींत
नभीं रेलून; केशरी
सूर्यकमळ हुंगीत !

क्षितिजाने मांडियला
रंगारंगाचा विलास
येथें येअुन थांबती
सर्व गंध, सर्व श्वास.

मिटे प्रकाशपापणी
येअी काळोखाचा थर
देत आतुर जगाला
लक्ष नक्षत्रांचा वर !

आलें अंधाराच्या घरीं
आमंत्रण प्रकाशास
मध्यरात्रीसहि झाला
दिव्य पहाटेचा भास !

आज जगलों अुल्हास !

## याचना

काय हवें तें मागुन घे; पण
मला तुझें नितनूतनपण दे !

कधी पोपटी रोपांवर तव
मायेची मृदु होते शिंपण
पानपान बेभान नाहतें
रोमरोम जागते तराऱ्न

हवी तेवढी शिंपण घे, पण
रोपांतिल तारुण्य मला दे !

तुझ्या मनांतिल अधुरे हेतु
रोजच्याच सांजेंत पाहतों
हत स्वप्नांचें गीत कांपरें
रात्रीच्या वाऱ्यांत अैकतों

दान सुखाचें साऱ्या घें, त्या
गीतांतिल कारुण्य मला दे !

आषाढांतिल आकाशाच्या
अंतरांतलें हळवेपण दे
सरत्या वर्षेतिल मेघांचें
भिरभिरतें बावरलेंपण दे

निदान हृदयीं खळखळणाऱ्या
रंगांना नावीन्य तरी दे
काय हवे ते मागुन घें, पण
मला तुझें नितनूतनपण दे !!

## नको आता रेंगाळणें

फुलावेंत मौनांतुन नव्या गीतांचे ताटवे
माझ्या भावनांना आता रंग हवे नवे नवे !

भल्या सकाळीं पाहतों गर्द मखमली आकाश
निळ्या मनांत साजते लखख ताऱ्यांची आरास
हिर्वळीच्या नेत्रीं जुन्या ओथंबती आठवणी
शहारते अलगेच तृणफुलांत चिमणी

आजवरी रेंगाळलों याच कौतुकाच्या सवे
माझ्या भावनांना आता रंग हवे नवे नवे !

जरा कमानी आडून पाही तगरीचा साज:
जुओंतून नकळत हळूं निथळते लाज
आळसतो कळींतुन गोड सुगंध मोकळा
मातीवर मोतियाचा कैफ लोळतो कोंवळा

झेंपावती कौलांकडे लाख किरणांचे थवे
आजवरी रेंगाळलों याच कौतुकाच्या सवे !

अुन्हातान्हाच्या प्रहरीं जेव्हा वेल भारावून
कुंपणाच्या तारेवर सुस्त रेलतसे मान
मधूनच फुंकर ये जड वाऱ्याची कुठूनी
शेवग्याच्या सावलीची आणि थरारे पापणी

अहेतुक हंसायाची हौस पानांचीहि निवे
आजवरी रेंगाळलों याच कौतुकाच्या सवे !

सांजकाळीं दाटून ये निळेपणांत काहूर
आणि विरक्तीचे सुन्न ढगांवरती केशर
तेव्हा सातही सुरांचा सोसवेना छळवाद
अंतरांत अुमटते खिन्न संगीताची साद

नको आता रेंगाळणें याहि कौतुकाच्या सवे
माझ्या भावनांना आता रंग हवे नवे नवे !

# बेत

नको शब्दता मौनास मध्यरात्रीच्या गहन
नको शिळेस यायला अर्त स्वरांचें स्फुरण
बरीं मुकाटलीं झाडें गूढ लोभस गुंगींत
नाही वाहत्या वाऱ्याची जरा बोंचरी संगत

दूर धूसरता निळें वस्त्र बैसली विणीत
कुठें असंगपणाचे रंग अबोल भरीत
अशा एकांतापरीस मूक एकलें उरावें
ओठ होऊन वाऱ्याचे पानांवरून फिरावें....

–हळू शालीन शांतीचें मुख जाहलें उजळ
तुझ्या मनापरी माझी चळे सावली निश्चळ
रित्या अंतरीं कुणीसें देत जांभई हसलें
आणि चांदण्याचे भोळचा बेत भाबडे फसले !

## हळुहळू...

हळुहळू सांजवेळेंत येतात
माझिया अपुऱ्या स्वप्नांचे रंग
अणूंत रेणूंत झुरतो माझाच
पहिला कोंवळा भावनाभंग.

निळ्या शांततेंत शिरते कांपत
हुर्हूर रोजची कारणांवाचून
क्षितिजाच्या मनीं चालतें माझिया
पहिल्या भेटीचें सांवळें चिंतन.

पेंगुळती डोळे अुजेडाचे; तेव्हां
मनांत जागते तम; आठवून:
कसा विश्वासलों कोंवळेंपणांत
घेअूनीया तुझें भुकेलें वचन!

# आषाढाच्या–

आषाढाच्या कातर अुत्तररात्रीं
कूस पालटुन
प्रहर अुघडतो डोळे
जडावलेले
निशा–नशेच्या स्वप्नोत्तर धुंदीने.
फुंकर घालुन सैल अुकलितो
चित्तकोष
मंतरला जो अधीर अतृप्तीने.
कैफाच्या मखमलींत झाकुन काया
हुपापलेली...पराधीन, सावळी
गहिऱ्या पुलकांनीं जी महिरुन आली;
आणिक तेव्हां–पुन्हा एकदां...
कण क्षणांचे जगले दिव्य प्रकाश !
आषाढाच्या अजून उत्तररात्रीं
मधाळलेल्या अुत्तेजक श्रांतीनें
धुंदकारलीं मनें अनंत नभाचीं,
अन् तृप्तीच्या उन्मादक गंधांत माखल्या

नीरवतेच्या
निळ्या रेशमी केसांमधुनी
फिरूं लागलीं
नाजुक शीतळ संथ कांपरीं
बोटें पर्जन्याचीं !
...आणि माझिया विव्हळ अस्तित्वाने
गालांपरि ओल्या अंगणांत जाउनी
मिटून अपुले ढगाळलेले डोळे
हळू घेतलें
अगतिक हळवें चुंबन अेकांताचें !

## उकल

नक्षत्रें जर तुला म्हणाली:
पुन्हा एकदा तसें शहारून:
'अकल वाकडे पीळ कालचे
पहा मनाला जरा वाकवुन.'

मायेच्या नजरेसम शीतळ
शिपडील आभाळ जिव्हाळा,
अंग अंग कुरवाळित राहिल
निकट तुझ्या अेकांत सांवळा.

काय खरोखर रितेपणांतहि
शोधशील तूं अपुलें नातें...
अनुतापाने भिजून निघतिल
काळोखाच्या कांठ मनाचे ?

## खिन्नता

मघाशींच संपलेली
मध्यरात्रीची संगत
अंग मोडून झोपला
अत्ता असाच निवांत.

मूक मिटून पापण्या
सारीं घरेंहि झोपलीं
रस्त्यावरून नशेंत
सुस्त घटका चालली.

तेव्हां पाहुण्या झुळुका
आल्या तशा परतल्या
चांदण्याच्या मांडीवर
घेती विसावा सांवल्या

घेओी गारवा आसरा
पोक्त रात्रीच्या कुशीचा
संथ डोळा जड झाला
मरगळल्या आशांचा.

व्यर्थ घेण्यांत अंदाज
वेळ सारा जाय रिता
मौनामागे लपलेली
जागी अजून खिन्नता !

## 'हो' म्हटलें तूं-

'हो' म्हटलें तूं- आणि मिळालें
लाख नभांचें मजला आंदण
आता त्रैलोक्याने यावे
लीनपणें मज मागाया ऋण.

हवें तेवढें तेजहि असने
आपणाहुन सूर्याला देअिन,
सदय होअुनी चांदण्यासहि
अुन्मादक कांतीने माखिन.

हळव्या बुजऱ्या काळोखाला
ताऱ्यांची शिकवीन धिटाओ,
अश्रूवेड्या एकांताला
व्यथेमागची हास्य-कमाओ

मागावा मज गंध कळीने
फांद्यांनो पोपटी, नव्हाळी,
रंगांचा लडिवाळ उषेने
हट्ट धरावा माझ्या जवळी.

शब्दांनी अर्थास्तव माझी
भीतभीत संमती पुसावी
लवून थोडे सात सुरांनी
गोड मदिरता शिकून घ्यावी.

'हो' म्हटलें तूं– आणिक फिटली
सा म र्थ्या वि ष यीं ची शंका;
खेळवीन बोटांवर आतां
सहज दिशांच्या दहा शलाका.

कुबेर येइल आता दारीं
हातीं घेउन झोळी काठी;
परमात्मा होईल भुकेला
माझ्या आ शि र्वा दा सा ठी !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २१९३९ विः काव्य
क्रमांक २३५५ नों: दि: २५।५।५८

## तळमळ

घट्ट मिठींत प्रेमाच्या
नको करूं आधमुसें
नको असें चिरडूंस
माझें प्रकाशाचे पिसें !

कुरवाळणें दृष्टीचें
आता जाळतसे जीवा
आलिंगनांत जाणवे
युगायुगाचा दुरावा !

मान्य ! सारा मायेमुळे
तुझा पडतो पाऊस,
पण ढगाळ हिवांत
भये थरारतें पीस !

आणि क्षमस्व ! जराशी
दाट झांवळी आवर
सावलींत संकोचतो
नवा आशाळू अंकुर !

म्हणुनीच अुमलेना
पालवींतलीहि कळी
जळीं असोन मासोळी
म्हणुनीच तळमळी ! !

## कांही दिवसांपुरतें

नेमियेल्या भेटीगाठी
आता व्हाव्यात विरळ
जरा अे क ले प णां त
जावी जिरुन भुरळ.

आतावरी खूप झाले
डोळे वाहणें- पुसणें
आणि सवेंच मनांत
समाधानाने हासणें !

किती जोडावे जिव्हाळे
डोळ्यामधल्या पाण्याने
किती मोडावें मनास
गोड फसवेपणाने ?

कांही दि व सां पु र तें
असें अलिप्त असावें
टोंक होवून शिदीचें
सारें दुरून पहावें !

लोटलेल्या का ळा स वे
मग सरेल दिमाख
अुमलेल वि र क्तीं त
पुन्हा नवीन ओळख !

# आतां

स्मरतें: तेव्हां कितीदा तरी
येतांक्षणींच
विरघळायचें नेत्रीं गीत
भिजायचीं ओठांतच नातीं
पेटायची अन्
स्पर्शांतुन विझलेली वीज !

आणिक आतां...किती दिसांनीं
आल्यावरही
ओठांमधलें विझलें गीत
डोळ्यांमाजीं भिजलीं नातीं
निरुपायाच्या
स्पर्शानें विरघळली वीज !!

## गणित

आजवर गणिताचीं
खूप अुत्तरें चुकलीं
अशा चुकांची जाणीव
चक्रवाढाने वाढली

पहिल्यान्दा मींच मला
मोठ्या संख्येने गुणिलें
भागाकाराने जगाच्या
माझें मूल्य मला दिलें !

अुत्साहाने मांडियलीं
त्रैराशिकें पा टी व र
भोळ्या आतुरपणाला
यश आलें निरुत्तर !

आता  सारें  अंधुकलें
काळ, काम  आणि वेग
सोप्यासोप्या अिच्छांचाहि
अडखळला  आवेग  !

प्रज्ञेचिया    पांडुरंगा,
होय  कृश  भा व ब ळ
आतातरी    शिकवावें
जरा नवें  वर्गमूळ  ! !

## शोध

कितो दिवसांपासून
माझा मीच हरपलों
शोधशोधलें परंतु
नाहीं मुळीं गवसलों

होती आस : सांपडेन
कुठें तान्हेल्या तंद्रींत
कुठें सातही स्वरांची
गुंतागुंत अुकलीत.

अुपचारांच्या कोषांत
किंवा गढलों असेन
वर अुथळपणाचें
दीन हसूं पांघरून

असें सारखें धुंडिलें
मींच हरपल्या मला
ठिसूळ या वागण्यांत
नाही सुगावा लागला !

कधी येईल कळेना
असा आसवांचा दीस
जेव्हा मीलनीं माझ्याच
मन निवेल खुषींत !

## धन्यता

कठिण वज्रास भेदून जाणारे
आले जरी वीर विठ्ठलाचे गाढे
नाहीत पावन होऊं अिच्छिणार
माझीया पापांचे निष्पर्ण सांगाडे.

विष्णुदास येवो, येवो दास विष्णु
नाम त्याचें किंवा स्वतां नाम–धारी
विझती पुण्याचे सहस्त्र सूर्यही
माझ्या दुरितांच्या तिमीर सागरीं !

अुद्धरिले जरी असुर, पतित
माझ्या पातकांचा कठीण अुद्धार
सांभाळ आपुली अैट अैश्वर्याची
माझ्या संगतीने होशील नादार !

पुण्याओी माझीया पापांची अमाप
जिने आकर्षिलें तुला येथवर
आता बाकी माझ्या धन्य पातकांनी
तुझ्या देवत्वाचा करावा अुद्धार ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ... २१८३८ वि: ... ९८५४
क्रमांक ... २३५०६ नों: दि: २४।५।५८



हें मला माहीत होतें
की पुन्हा येशील तूंही
ओळखीच्या लोचनांची
पाहण्या नवखी धिटाओी.

दाविण्या : ना सोसलेल्या
वेदनांची तीव्र लाही
अन् जुन्या चुकलेपणाच्या
'मान्य' तेची चिंब घाओी.

मानभावी मान्यता ही
आंतली तैसीच भीति
मानभावी वेदना अन्
आसवांची धारही ती !

हें मला माहीत झालें
जेधवां आलीस येथें
मानभावी लोचनांनी
मागण्या मागील नातें !

हें जरी माहीत होतें
व्यर्थलें सारें तरीहि...
मानभावी मान माझा
गळला कधी; कळलेंहि नाही !

## निष्फळ

सारें विश्व आपंगाया
माझें क्षितोजावें मन
लाभो तनूस कृतार्थ
दधिचीचें समाधान !

दुःखें पुसाया, घ्यावेत
ओठ रात्रीचे मागून
लख्ख आल्हाद पाहण्या
पहांटावेत लोचन !

याच आशीर्वादासाठी
झुरो साफल्याचा क्षण
घ्यावी तरीच निष्फळ
तुझ्या पायांशीं लोळण !!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९०२
शाखा

# शुद्धिपत्रक

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | १ | रविकरणीं | रविकिरणीं |
| ११ | १० | मनासीं | मानसीं |
| २१ | ६ | स्त्रावणारा | स्रवणारा |
| ३३ | ५ | घुसरतेच्या | धूसरतेच्या |
| ,, | ६ | सकाळाचे | सकाळचे |
| ३५ | १ | प्राणिपात | प्रणिपात |
| ४७ | २ | अर्त | आर्त |
| ४० | ५ | फुललें | फुलेल |
| ६५ | ८ | सगारीं | सागरीं |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २९८३८ वि. काव्य
क्रमांक ९३५०५ नों: दि: २५।५।५८